# छत्रपती शिवाजी महाराजांची स्वराज्याची संकल्पना

**शेषनारायण श्रीमंत वडवे** डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ- वडगाव, जि. कोल्हापूर

---

**प्रस्तावना -**

स्वराज्याची कल्पना वैदिक काळात मांडण्यात आली आहे. वैदिक काळात 'ऐतरेय ब्राह्मण' ग्रंथात वेगवेगळया राज्यघटनांचा उल्लेख आहे. त्यात स्वराज्य, वैराज्य, साम्राज्य वगैरे राज्यघटनांचा उल्लेख आहे. स्वराज्याची कल्पना ही जवळ-जवळ अडीच हजार वर्षानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी उचलली आणि स्वराज्य स्थापन केले. इ. स. १६४५ साली रोहिरखोऱ्यात व वेलखंड खोऱ्याचा कुळकर्णी दादाजी नरसी प्रभू याला पाठविलेल्या पत्रात छत्रपती शिवराय लिहितात की, "वजिराचा विजापुराहून हुकूम आला तो ठाणे सिरवलाहून अमिनानी तुम्हाकडे पाठविला. त्याजवरून तुमचे बाप नररीबाबा हवालदिल जाले वगैरे कितेक बहुतेक लि त्यास शाहासी बेमानगिरी तुम्ही व आंम्ही करीत नाही. श्री रोहिरेश्वर तुमचे खोरियातील आदि कुलदेव तुमचा डोंगरमाथा पठारावर शेंद्रीलगत स्वयंभू आहे त्याणी आम्हास यश दिल्हे व पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे. त्यास बावास हवाल होऊ नये." (देशपांडे प्र. न. १९८३ : ४ ) महाराजांच्या या पत्रातून लक्षात येते की, शिवाजी महाराजांनी 'हिंदवी स्वराज्य' हा शब्द प्रथम वापरला आहे. हिंदवी शब्दाचा तत्कालीन अर्थ मराठी असा आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी ताब्यात घेतलेल्या सर्वत्र भूभागाला स्वराज्य असे म्हटले जाई. स्वराज्य म्हणजे स्वत:चे राज्य. वैदिक काळातील स्वराज्याची कल्पना वेगळी होती. तो राज्यघटनेचा प्रकार होता आणि कदाचित त्या काळात स्वत:च्या आत्म्यावर स्वत:चे प्रभुत्व स्थापन करणे आणि लोकांच्या हातामध्ये राजकीय सत्ता प्रदान करणे हे दोन अर्थ होते. स्वराज्याची राज्यघटना लोकशाहीवादी होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळामध्ये स्वराज्याचा या प्रकारचा अर्थ अभिप्रेत नव्हता. शिवाजी महाराजांनी या महाराष्ट्रभूमीत स्वराज्याची स्थापना केली. स्वराज्य म्हणजे स्वत:चे राज्य जे राज्य आंतर्बाह्य शक्तीपासून सार्वभौम असेल असे राज्य होय. प्रा. मा. म. देशमुख यांच्या मते 'हिंदवी स्वराज्य म्हणजे मराठी लोकांचे स्वत:चे राज्य हिंदू राज्य नव्हे, हिंदवी या शब्दाचा अर्थ भारतीय असा होतो. हिंदू हा शब्दसुध्दा स्थलवाचक आहे. जसे पंजाबी म्हणजे पंजाबात राहणारा. मराठा म्हणजे महाराष्ट्रात राहणारा. मग तो कोणत्याही धर्माचा असो.' (देशमुख मा. म. १९९१ : ६)

एतद्देशीयांचे राज्य या देशावर व्हावे या भुमिकेचे आपण समर्थक आहोत, असे छत्रपती शिवाजी महाराजांनी मानले आहे. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या मते 'स्वराज्याला पर्यायी असा शब्द 'महाराष्ट्र राज्य' असा आहे. या अर्थाचा शब्द कान्होजी जेधे यांनी वापरला आहे.' (कुलकर्णी अ. रा. : १५) 'महाराष्ट्र राज्य' म्हणजे 'मराठी लोकांचे राज्य' होय. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे जरी आजच्या अर्थाने लोकशाही राज्य नसले तरी राजाने जास्तीत-जास्त लोकांच्या कल्याणार्थ प्रयत्न केले पाहिजेत. लोकांच्या कल्याणासाठी काम केले पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यासाठी त्यांनी राज्याच्या साधनाचा वापर केला. या सगळया गोष्टी साकल्याने लक्षात घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांची स्वराज्य संकल्पना लक्षात घेता येईल.

**छत्रपती शिवाजी महाराजांची स्वराज्याची संकल्पना -**

स्वराज्यामध्ये सर्व व्यवस्था उत्तम असावी यासाठी छत्रपती शिवाजी महाराज किती दक्ष होते. हे त्यांच्या अनेक पत्रावरून दिसून येते. 'अखंड सावधान' ही महाराजांची सततची आज्ञा होती; कारण आपल्या सीमेशी लागून असलेल्या त्या दोन प्रबळ सत्ता आदिलशाही आणि मोगल आपल्या प्रदेशावर केव्हा झडप घालतील आणि तेथील रयतेला कैद करून नेतील याचा भरवसा नसे. अशा परिस्थितीत देशमुखांचे मुख्य कर्तव्य म्हणजे "तरी तुंम्हास रोखा अहडताच तुम्ही तमाम आपले तपियात गावचा गाव ताकिद करून माणसे लेकरेबाळे समतर तमाम रयेति लोकास घाटाखाले बाका जागा असेल तेथे पाठवणे. जेथे गनिमाचा आजार पहुचेना ऐशा जागियासि त्यासि पाठविणे ये कामास हैगै न करणे रोखा अहडताच र+ सदरहू लिहिलेप्रमाणे अमल करणे- ऐसियासी तुम्हांपासून अंतर पडलियावरि मोगल जे बांद धरून नेतील त्याचे पाप तुमचा माथा बैसेल. ऐसे समजोन गावचा गाव हिंडोनु रातीचा दिवस करून लोकाची माणसे घाटाखाले जागा असेल तेथे पाठवणे या कामास एक घडीचा दिरंग न करणे" (देशपांडे प्र. न, १९८३ : ९९) अशी समज छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्जा जेधे यांना लिहिलेल्या पत्रातून दिलेली दिसून येते. आपल्या स्वराज्याचे, तेथील रयतेचे रक्षण करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. असे महाराज सतत मानीत आले होते. शायिस्तेखानाची मानहानी करून आपल्या मुलखातून त्याला हुसकून लावल्यावर आपल्या भूमीचे रक्षण करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे! पटविण्यासाठी एका मोगली अधिकाऱ्याला लिहिलेल्या पत्रात महाराज म्हणतात की, "आज तीन वर्षे बादशहाचे मोठमोठे सल्लागार व योद्धे आमचा प्रदेश काबीज करण्यासाठी चालून येत आहेत हे तुम्हां सर्वास माहित आहेच. बादशहा हुकूम फर्मावितात, 'शिवाजीचे किल्ले व मुलूख काबीज करा! तुम्ही जबाव पाठविता 'आम्ही लवकरच काबीज करतो! (पण) या आमच्या दुर्गम प्रदेशात नुसता कल्पनेचा घोडा सुद्धा नाचविणे कठीण आहे." (कुलकर्णी अ. रा, १९९९ : ३४)

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात कोणत्याही प्रकारच्या लबाडीला थारा नव्हता. शिवाजी महाराजांच्या मते "आठ महिने बाहेर लष्करांनी परमुलखात पोट भरावें. खंडण्या घ्याव्या आठ महिने परमुलखांत स्वारी करावी. वैशाखमासीं परतोन छावणीस येताच आपले मुलखाचे सरदेस कुल लष्कराचा झाडा घ्यावा. पूर्वील बिशादीचे जाबते रजू घालावे. ज्याजती होईल तितकी किंमत करून त्याच्या हक्कात धरावी. थोर किंमतीचा वस्तभाव असलियास दिवाणांस द्यावी. कोणी चोरून ठेवील आणि दाखल सरदारास

जाहलियाने शासन करावें." (सभासद कृष्णाजी अनंत, १९८६ : ३२) छत्रपती शिवाजी महाराज रयतेला पोटच्या पोराप्रमाणे जपत. कोणावरही अन्याय होऊ देत नसत. गरीब, अपंग जनतेला त्रास देणे हे त्यांच्या तत्त्वात कधीचं बसत नसे. छत्रपती शिवाजी महाराजांची रयतेविषयीची तळमळ शब्दांशब्दातून प्रकट होते. महाराजांनी चिपळूणच्या जुमलेदार व कारकुनास लिहिलेल्या पत्रातून त्यांची जनतेविषयीची तळमळ प्रकट होते. चिपळूण या कसब्याच्या ठिकाणी साहेबांनी लष्कराच्या योगक्षेमांची सर्व व्यवस्था केली होती. त्यामुळे घाटावर सैन्यांने जाण्याचे काही कारण राहिले नव्हते. म्हणून त्यांना छावणीस रवाना करण्यात आले होते. चिपळूणास सैन्याचा मुक्काम होता.

दाभोळच्या सुभ्यात पावसाळ्याची बेगमी म्हणून सारी सामग्री, दाणा आणि इतर वरकड गोष्टींचा संचय केला होता. पण त्यापैकी बराच भाग आधीच खर्चून गेला होता. त्यामुळे चिपळूणच्या आसपासच्या प्रदेशात लष्कराने गवत आणि इतर वरकड बाबींसाठी लोकांना त्रास देण्यास सुरूवात केली. त्यामुळे तेथे आता काही सुस्थिती राहिली नव्हती. अशा अवस्थेत वैशाख महिन्याचे वीस दिवस आणि हा उन्हाळा हे सैन्याला अधिक कष्टाचे झाले. त्यामुळे पागा जाग्यावर बसून राहिली. परंतु त्यांची व्यवस्था करणे जरूर होते, म्हणून कारकूनाकडून आणि गडोगडी जो धान्यसंचय होतो तो देऊन होईल तितकी लष्कराची बेगमी (तरतूद) केली होती. अशी व्यवस्था केल्यावर शिवाजीराजे अधिकाऱ्यांना बजावतात की, "याउपरी, तुम्ही मनात येईल तसा दाणा, रोजचा खुराक, गवत मागाल असेल तोपर्यंत धुंदी करून कशाची पर्वा न करता चाराल आणि सर्व सामग्री नाहीसी झाली, म्हणजे मग काही पडत्या पावसात मिळणार नाही. उपास पडतील, घोडी मरावयास लागतील. याचा अर्थ घोडी तुंम्हीच मारली असा होईल आणि दाणा वैरणीसाठी आजूबाजूच्या प्रदेशाला त्रास देऊ लागाल. असे झाले म्हणजे सैन्यांतले लोक गावात जातील. कोणी कुणब्याचे तेथील दाणे, कोणी भाकर, कोणी गवत, लाकुडफाटे, कोणी भाजी, कोणी पाले इ. ऐवज घेऊन येतील आणि असा त्रास कुणबी लोकांना होऊ लागला. म्हणजे जे काही कुणबी घरं धरून आणि केवळ आपला जीव मात्र कोणी घेऊन राहिले आहेत तेही जाऊ लागतील. कित्येक लोक उपाशी मरू लागतील. म्हणजे त्या लोकांना असे वाटूं लागेल की मुघलांच्या धाडीपेक्षा तुमची धाड अधिक झाली असा लोकांचा तळतळाट होईल." (देशपांडे प्र. न, १९८३ : १५७)

या पत्रातील बारीकसारीक तपशील पाहिला म्हणजे शिवाजी राजांच्या चौफेर दृष्टीचा आणि राज्याच्या प्रत्येक बाबतीत जातीने लक्ष घालण्याच्या पद्धतीचा पुरेपूर प्रत्यय येतो. सैन्याचे लाड करावयाच्या वेळी ते करण्यात राजे कसलीही कसूर करीत नसत, पण प्रसंगी कडक होऊन जरब दाखविण्याच्या कामी देखील ते मागे पुढे पाहत नसत. प्रजेचे हित घोडयांची काळजी, दाणा-वैरणीची जपणूक अशा कितीतरी गोष्टी राजांच्या नजरेपुढे पत्र सांगताना कशा येत होत्या याची कल्पना येते. छत्रपती शिवाजी महाराज या पत्रात सैन्याला ताकीद देतात की, मोगलांचे सैन्य ज्याप्रकारे प्रजेला त्रास देत होते त्याच प्रकारे तुम्ही प्रजेला त्रास दयाल तर रयत तुमच्या त्रासाला कंटाळून तुमच्या राज्यापेक्षा मोगलांचे राज्य बरे होते असे म्हणेल. म्हणून छत्रपती शिवाजी महाराज सैन्याला सांगतात की, रयतेला कोणत्याही प्रकारचा त्रास होता कामा नये. तुंम्हाला ज्या गोष्टी लागतील त्या बाजारात रास्त भाव देऊन विकत घ्याव्यात प्रजेला नाहक त्रास देऊ नये. अशा प्रकारे शिवाजी महाराज रयतेची पोटच्या पोरापमाणे काळजी घेत असत.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतंत्र व सार्वभौम राज्य निर्माण करताना सर्व धर्मियांना या कार्यात सामील करून घेतले होते. आपले राज्य सर्वांसाठी आहे आणि जो अन्य धर्मियावर जुलूम करणार नाही असा कोणीही आपल्या राज्याच्या कारभारांत सहभागी होऊ शकतो. अशी शिवाजी महाराजांची भूमिका होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी सामाजिक जीवनांत काही मोठे स्थित्यंतर घडवून आणायचे त्यांचे ध्येय होते असे दिसत नाही. तथापि आपल्या भोवतालच्या सामाजिक जीवनांतले दोष त्यांना दिसत होते. जाती-जमातीतल्या भेदामुळे आपला समाज कायम भंगलेला राहतो हे त्यांना कळत होते. ब्राह्मण, मराठा, महार वगैरे जाती- जमातीमधील वैमनस्यांमुळे आपली जनता एखाद्या कार्यासाठी एकत्र एकदिलाने उभी रहाणे अवघड होऊन बसते हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या लक्षात आलेले होते. पण त्यावर उपाय म्हणजे जातिभेद नष्ट करून टाकण्यासारखा मुळावरच घाव घालणारा असा कोणताही कार्यक्रम त्यांनी दिला नाही. कारण त्या काळात शक्य नव्हते.

परंतु परकी राजवट संपवून स्वराज्य स्थापन करणे त्यांचे ध्येय होते. तथापि आपले राजकीय कार्य निर्विघ्नपणे पुढे चालावे म्हणून आणि जाती-जमातींच्या सबंधात काही एक समतोल राहील अशी व्यवस्था करायला मात्र ते चुकले नाहीत. किल्ल्यावर किल्लेदार जातीने मराठा असावा, सबनीस ब्राह्मण असावा आणि कारखानीस प्रभूचं असावा असा जो एक शिरस्ता त्यांनी घालून दिला त्यामागे हेतू असा होता की, कोणत्याही एकाच जमातीचे लोक एका ठिकाणी एकत्र होऊन त्यांना काही खूळ उठविण्याची संधी मिळू नये. प्रा. भवरे यांच्या मते, "छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यामध्ये सर्व जाती, धर्माच्या माणसांना विकासाची संधी दिली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या अष्टप्रधान मंडळात आठ प्रधानापैकी सात प्रधान हे ब्राह्मण जातीतील नेमले होते. तर एक प्रधान हा अब्राह्मण होता. तो मराठा जातीचा सरनोबत म्हणून नेमला होता." (Bhavare N. G, 1982 :190) छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या प्रशासकीय व्यवस्थेत पेशवा म्हणून मोरोपंत पिंगळे, सचिव म्हणून अण्णाजी दत्तो आणि वाकनीस म्हणून दत्ताजीपंत या ब्राह्मण जातीतील हुमार व्यक्तींची निवड केली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्यामध्ये सुभेदार व सरसुभेदार या पदावर येसाजी मल्हार, परसोजी महाडिक, कृष्णाजी भास्कर, महादाजी सामराज, कोणेर रंगनाथ, विठ्ठल दत्तो, गोपाल रामजी इ. तर लष्करी अधिकाऱ्यांमध्ये मजूमदार व सबनीस तसेच हेजीब किंवा वकील या पदावर अबाजी महादेव, उमाजी पंडीत, निराजी राहूजी, प्रल्हाद निराजी, पंताजी गोपीनाथ बोकील इ.

ब्राह्मण व्यक्तीची अनेक पदावर नियुक्ती करून त्यांना स्वराज्यात विकासाची संधी दिली होती. सरनोबत किंवा सेनापती या पदावर तुकोजी, मानकोजी दहातोंडे, नेताजी पालकर, येसाजी कंक, कडतोजी गुजर, हंबीरराव इ. मराठा समाजातील व्यक्तिंची नियुक्ती केली होती. शिवाजी महाराजांनी आपल्या हिंदवी स्वराज्यामध्ये लष्करी व्यवस्था, प्रशासकीय व्यवस्था तसेच सरदार या पदावर देखील अनेक मराठा जातीतील लोकांची नियुक्ती केल्याचे दिसून येते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्यामध्ये ब्राम्हण, मराठा खेरीज मुस्लिम व इतर जातीतील अनेक व्यक्तिंना विकासाची संधी दिली होती. त्यामध्ये शिवाजी महाराजांचा अंगरक्षक म्हणून न्हावी समाजातील जिवू महाल, गुप्तहेर विभागात रामोशी समाजातील बहिर्जी जाधव, मेट नाईक म्हणून कलनाक महार आणि येसनाक महार सोंडकर यांची तर किल्ल्याच्या भोवती रखवालदाराचे कामावर महार वगैरे अस्पृश्य आणि भिल्ल, रामोशी वगैरे आदिवासी जातीतील व्यक्तिंची नेमणूक केली होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदरी अनेक मुसलमान सरदार, वतनदार व इतर चाकर होते. त्यामध्ये शिवाजी महाराजांचा तोफखाना प्रमुख इब्राहिमखान, आरमार प्रमुख दौलतखान, दर्यासारंग शिवाजी महाराजांच्या खास अंगरक्षकांत व खाजगी नोकरांत अत्यंत विश्वासू म्हणून मदारी म्हेतर होता, छत्रपती शिवाजी महाराजांचा वकिल म्हणून काजी हैदर, सरदार म्हणून सिद्दी हिलाल, शिलेदार म्हणून शामाखान, सरनोबत म्हणून नूरखान बेग इ. अशा अनेक मुस्लिम धर्मातील व्यक्तिंना शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्यामध्ये विकासाची संधी दिली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यात सर्वांना विकासाची समान संधी दिली होती. त्यांनी हिंदूची व्यापक अशी व्याख्या केली होती. बाटून मुसलमान झालेल्यांना पुन्हा हिंदू करून घेण्याचा त्यांनी केलेला उद्योग फार महत्त्वाचा मानला पाहिजे. नेताजी पालकर, निंबाळकर वगैरे कित्येक बाटलेले हिंदू केवळ हिंदू धर्मात घेतले गेले एवढेच नाही तर एकदा सक्तीने मुसलमान होणे भाग पडल्यामुळे त्यांची सामाजिक प्रतिष्ठा जराही कमी होऊ दिली नाही. हे लोकांना दाखवून देण्यासाठी अशा घराण्याशी छत्रपती शिवाजी महाराजांनी मुद्दाम सोयरीकही जोडल्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी ब्राह्मण म्हणून कोणाची गय केली नाही. मराठा म्हणून कोणाचे लाड केले नाहीत आणि शूद्र म्हणून कोणाला दूर लोटले नाही. सामाजिक व्यवहारात या सगळ्यांचे रोटी-बेटी व्यवहार जसे परंपरेने चालू होते तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी चालू ठेवले. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्यात सर्व जाती-धर्माच्या व्यक्तींचा विकास झालेला दिसून येतो.

स्वराज्य कार्यासाठी कार्यकर्त्यांची मजबूत संघटना उभारणे महाराजांना आवश्यक होते. ही संघटना उभारण्यासाठी स्वतः शिवाजीराजे किती दक्ष होते ते त्यांच्या पत्रावरून लक्षात येते. हैबतराव देशमुखाला महाराजांनी लिहिलेल्या पत्रातून दिसून येते की, महाराज आपल्या सहकाऱ्यांमध्ये केवळ निष्ठाच नव्हे तर प्रेम आणि जिव्हाळा कसे निर्माण करीत याची साक्ष देतात. “तुम्हांस साहेब घरिच्या लेकरासारखे जाणिती आमच्या इमानावरी आपली मान ठेऊन आम्हापासी येणे.” (देशपांडे प्र. न, १९८३ : ८१) रूद्राप्पा देसाईस लिहिलेल्या पत्रात साहेबकाम उदंड कराल स्वामीही तुमची हरबाब मदत करवितील इ वाक्य मननीय आहेत. मराठयांचे संघटन करण्यासाठी महाराजांनी विलक्षण चातुर्य दाखविले. कधी चुकलेल्यांना क्षमा करून, कधी संशयग्रस्तांना दिलासा देऊन, कधी भेदरलेल्यांना अभय देऊन तर कधी इनामाचे आमिष दाखवून महाराजांनी माणसे जोडली. छत्रपती शिवाजी महाराजांनी मालोजी घोरपडेंना लिहिलेल्या पत्रातून त्यांचा स्वराज्याचा उद्देश व्यक्त होतो. एकूण पत्रावरून खालील चार मुद्दे निघतात ते म्हणजे........

१. मालोजी घोरपडेंच्या वडिलांपासून घोरपडे व भोसले घराण्यांत जो झगडा चालत आला होता. तो मालोजी घोरपडेंना आपल्या स्वराज्याच्या कार्यात सामील करून शिवाजी महाराजांना मिटवायचा होता.

२. हल्ली दक्षिणचा पादशहा पठाण म्हणजे विजापूरात बहलोलखान पठाण प्रभावी झाला आहे. ही गोष्ट योग्य नाही. कारण पठाण बळावला तर तो दक्षिणेकडील सर्वांची राज्य बुडवील. कोणासही तग धरू देणार नाही. म्हणूनच शिवाजी महाराज म्हणतात की, आंम्ही हजरत कुतुबशहाशी मैत्री केली आहे.

३. त्यावरून कुतुबशहांनी आंम्हास 'हुजूर भेटीस येणे' असे खुदद हजरत कुतुबशहांनी सांगितले. तेंव्हा त्यांच्या भेटीस गेलो. भेटीस गेल्यावर शिवाजी महाराजांनी पूर्वी जो राज्याभिषेक करून घेतला होता. त्याला कुतुबशहांनी हिंदवी स्वराज्याच्या 'राजा' किंवा छत्रपती म्हणून मान्यता दिलेली होती असे दिसून येते.

४. शिवाजी महाराज म्हणतात की आपल्या जातीच्या मराठिया लोकांचे बरे करावे म्हणून आंम्ही हजरत कुतुबशहाशी बहुत प्रकारे बोलणी केली आहे. पठाण तुंम्हाला आता जेवढे देतो त्याच्या पेक्षा जास्त किंवा दुप्पट आंम्ही कुतुबशहाकडून तुंम्हाला देवू कारण पुढे आम्ही आणि कुतुबशहा मिळून पठाणाचे राज्य बुडविणार आहोत. तेंव्हा तुम्ही आमच्या कार्यात सामील होऊन दक्षिणची पातशाही दक्षिणेकडच्या पातशहाच्या हाती ठेवण्यास सहकार्य करावे.

**समारोप -**

छत्रपती शिवाजी महाराजांनी या महाराष्ट्रभूमीत स्वराज्याची स्थापना केली. स्वराज्य म्हणजे स्वत:चे राज्य जे राज्य आंतर्बाह्य शक्तीपासून सार्वभौम असेल असे राज्य अभिप्रेत होते. ‘हिंदवी स्वराज्य म्हणजे मराठी लोकांचे स्वत:चे राज्य हिंदू राज्य नव्हे, हिंदवी या शब्दाचा अर्थ भारतीय असा अभिप्रेत आहे.

**संदर्भ ग्रंथसूची-**

1. डॉ. प्र. न. देशपांडे, (सं) १९८३, ‘छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे’सुषमा प्रकाशन, धुळे, प्रथमावृत्ती.

2. देशमुख मा. म., १९९०, 'शिवशाही', शिवभारती प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती पुनर्मुद्रित.
3. कुलकर्णी (डॉ.) अ. रा. 'अशी होती होती शिवशाही', राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे
4. सभासद कृष्णाजी आनंत, १९८६, 'सभासद बखर' (सं) हेरवाडकर र. वि, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती.
5. Bhaware N. G.'castefavaours, patronage & privilieges under Shivaji's Rule (ed) Kamble B. R. 'Studies in Shivaji & his time' Shivaji University, Kolhapur first edition